


रजि. नं. महा/४३१/२०१६
एफ. १७९८६, (सांगली)

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

## येळवी, ता. जत, जि. सांगली.

# ANNUAL REPORT 2022-23

1 April 2022 to 31 March 2023



# ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था

येळवी, ता. जत, जि. सांगली.

बळ एकीचे... नाते माणुसकीचे...

संस्थेचा इतिवृत्त.....

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था गेली ३० वर्षे होऊन अधिक काळ कला क्रीडा सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक क्षेत्रात भरीव योगदान देत आहे यामध्ये संस्थेच्या वतीने लोकसहभागातून स्पर्धा परीक्षा ग्रंथालयाची स्थापना, विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन, आरोग्य शिबीरे, रक्तदान शिबिरे आज, एस.टी महामंडळाचे 'स्मार्ट कार्ड' योजना, कन्यारत्न ठेव योजना, माजी सैनिक ,सैनिक पत्नी, अशा वर्कर, अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस यांचा सन्मान सोहळा, महिला दिन, जनरल नॉलेज स्पर्धा परीक्षा, प्रबोधनात्मक व्याख्यानमाला, रांगोळी स्पर्धा, चित्रकला स्पर्धा, पॅन कार्ड, आधारकार्ड, रेशन कार्ड शिबिरे, वृक्षारोपण, स्वच्छता अभियान, विविध महापुरुषांची जयंती, सांस्कृतिक कार्यक्रम अशी विविध लोकोपयोगी समाज उपयोगी कामे संस्थेच्यावतीने करण्यात आली आहेत .

गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळ्याचे आयोजन, केरळ पूरग्रस्तांसाठी संस्थेकडून मदत, आरोग्य शिबिरा अंतर्गत अनेक गरजूंना मोफत औषध उपचार, 'श्रीं' च्या प्रतिष्ठापनेने वृक्षारोपण व स्वच्छता मोहीम, पाणी फौंडेशनमध्ये संस्थेचा सक्रिय सहभाग व सहभागाबद्दल प्रशस्तीपत्र, लहान मुलांसाठी मनोरंजनात्मक कार्यक्रम, पहिली ते बारावी पर्यंतच्या शिक्षणासाठी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियमची स्थापना, स्पर्धात्मक परीक्षेसाठी विशेष वर्गाची व्यवस्था. ओंकार स्वरूपा या संस्थेने केंद्र सरकारने ग्रामीण व गरीब गरजू जनतेसाठी 'आयुष्यमान भारत जन आरोग्य योजना' चे गोल्डन कार्ड तयार करण्यासाठीच्या शिबिराचे आयोजन.

फॅशन डिझायनिंग कोर्स ५० महिलांना तीन महिन्याकरिता मोफत प्रशिक्षण.

कोरोना काळात विधवा परितक्त्या, एकल महिलांना मोफत दोन महिने पुरेल इतके किराणा साहित्य.

कोरोना संकटकाळात वन विभाग व कृषी विभागांमध्ये गावातील ५० बेरोजगार नागरिकांना रोजगार हमीच्या कामातून काम मिळवून दिले व त्याची रक्कम रुपये रोजगार ३ लाख रूपये त्या लोकांना रोजगार मिळवून दिला.

आमच्या संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मा. अनिल अंकलगी साहेब यांच्या संकल्पनेतून ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज साकार होत आहे. ग्रामीण भागात इंग्रजीचे ज्ञान विद्यार्थ्यास मिळावे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वाढत्या स्पर्धेच्या युगात पुढे जाण्यासाठी व आवश्यक असलेले शिक्षण मिळावे म्हणून या प्रशालेची सुरुवात करण्यात आलेली आहे. व त्याचबरोबर ग्रामीण भागातील मुलींना सायन्ससाठी परगावी न जाता आपल्याच गावात शिक्षण मिळावे हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून अंकलगी साहेबांनी ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची स्थापना केली.

केंद्र शासनाच्या जिल्हास्तरीय उत्कृष्ट संस्था पुरस्काराने संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे. विविध शासकीय योजनाची माहिती बद्दल संस्थेला जत तहसील कार्यालय यांच्याकडून प्रशस्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले आहे. तसेच जिल्हा सैनिक बोर्ड सांगली यांच्याकडून सैनिकांचा सन्मान सोहळा आयोजित केल्याबद्दल गौरव पत्र देऊन संस्थेला सन्मानित करण्यात आले आहे.

**संतोष माणिकराव पाटील**

सचिव : ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था

मो. ९१३००२३३०७

# अनुक्रमणिका ...

१. संस्थेची माहिती ... ....................................................................०३

२. १ मे महाराष्ट्र दिन साजरा... २१ जून योग दिन साजरा... ................. ०४

३. आरोग्य शिबीर संपन्न... ............................................................ ०५

४. आण्विक विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर प्रदर्शन
आणि चर्चासत्र ... गुरुपोर्णिमा साजरी... .................................... ०६

५. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन साजरा...
राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा स्पर्धांचे आयोजन ... ..................... ०७

६. नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ संपन्न ...
आधार कार्ड नोंदणी शिबीर ... .................................................... ०८

७. नवरात्रोत्सव प्रारंभ ... जागर 'स्त्री' शक्तीचा अंतर्गत
विविध कार्यक्रम... .................................................................... ०९

८. डॉ.ए.पी.जे. अब्दलु कलाम जन्मदिनी वाद-विवाद स्पर्धा संपन्न...
सहल मामाचं गाव ... सावित्रीबाई फुले जयंती साजरी... ................ १०

९. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन ...
प्रजासत्ताक दिन साजरा ... ......................................................... ११

१०. ओंकार स्वरुपा फेस्टिवल 2023 ... ............................................ १२

११. इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ...
हळदी-कुंकू समारंभ ... ............................................................... १३

१२. विज्ञान दिवस साजरा... महिलांसाठी 'खवय्याची जत्रा' कार्यक्रम... .. १४

१३. अंगणवाडी विद्यार्थ्यांचा 'Kindergarten' कार्यक्रम साजरा... ....... १५

# संस्थेची माहिती ...

संस्थेचे आधारस्तंभ



मा. अनिल अंकलगी

संस्थेचे अध्यक्ष



मा. दिपक (आण्णा) अंकलगी

संस्थेचे सचिव



मा. संतोष पाटील
ग्रा.प. सदस्य, येळवी.

'बळ एकीचे... नाते माणूसकीचे', हेच ब्रीद वाक्य घेऊन मागील ३० वर्षांपासून ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था काम करत आहे.

ओंकार स्वरुपा ही केवळ एक संस्था नाही तर एक व्यासपीठ आहे. सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या सहकाऱ्यांशी समन्वय साधून सहकाऱ्यांच्या सहकार्याने एक रचनात्मक कार्य करावे हा मुख्य हेतू ठेवून संस्थेची स्थापना करण्यात आली आहे.

संस्थेच्या या जडणघडणीत अनेकांचा वाटा आहे. सर्वांच्या सहकार्याच्या जोरावरच संस्थेने आपल्या सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत 'माणूसकी हाच धर्म' मानून कार्य केलेले आहे.

संस्थेने सामाजिक बांधिलकी जपत येळवी सह पंचक्रोशीतील नागरीकांसाठी अनेक समाजोपयोगी, लोकोपयोगी कार्य केले आहे. यामध्ये महिलांसाठी प्रशिक्षण, बेरोजगारांसाठी रोजगार उपलब्ध करुन दिले, कोरोना काळात जीवनावश्यक वस्तूंचे मोफत वाटप केले, कन्यारत्न ठेव योजना सुरु केली, शासकीय, प्रशासकीय कागदपत्रे सहज उपलब्ध करुन देणेसाठी शिबीरांचे आयोजन केले असे अनेक नवनवीन उपक्रम राबवून माणूसकीचं नातं आणि एकीचं बळं निर्माण केलेलं आहे...

आज या संस्थेचे वटवृक्षात रुपांतर झाले आहे. लहानापासून थोरापर्यंत... येळवीसह पंचक्रोशीतील नागरिकांना संस्था आपलीशी वाटू लागते यामध्ये सारे आले.

सर्व सन्माननीय सदस्य, पदाधिकारी व कर्मचारी वृंद

## १ मे महाराष्ट्र दिन साजरा...





ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी येथे
आज 'महाराष्ट्र दिन' साजरा करण्यात आला.
तसेच प्रशालेचा निकाल आज जाहीर करण्यात आला...

## २१ जून योग दिन साजरा...

International day of yoga 21st June

Yoga for Harmony & Peace





ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड
ज्युनिअर कॉलेज येळवी. ता.जत
येथे आज योग दिवस साजरा करण्यात
आला यावेळची काही छायाचित्रे....

# आरोग्य शिबीर संपन्न...

**येळवी येथे ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था व विठ्ठल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मार्फत आरोग्य शिबीर संपन्न..... 200 गरीब गरजू रुग्णांना मोफत औषधोपचार....**



२ | कोल्हापूर - बुधवार, ८ जून २०२२

In Short

येळवी : येथे आरोग्य शिबिराचे उद्घाटन करताना येळवीचे उपसरपंच सुनील अंकलगी.

## विठ्ठल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जतसाठी वरदान-सुनील अंकलगी

जत / प्रतिनिधी : विठ्ठल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल जतसाठी वरदान ठरेल, असे प्रतिपादन येळवीचे उपसरपंच सुनील अंकलगी यांनी केले. येथे नव्याने उभारण्यात येत असलेल्या विठ्ठल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलतर्फे येळवी येथे आयोजित आरोग्य शिबिराचे उद्घाटन अंकलगी यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी, ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, सचिन माने, येळवी सोसायटीचे चेअरमन संतोष स्वामी, डॉ. विकास पाटील, डॉ. एच. जी. राम्याश्री, डॉ. सचिन वाघ, डॉ. सुनील वणकुंद्रे, डॉ. विवेकानंद स्वामी, डॉ. निलेश माने, विलास मालगत्ते, शशिकांत गानमोटे, आनंदा क्षीरसागर, संतोष पोरे, गजानन पतंगे उपस्थित होते. यावेळी २०० रूग्णांची तपासणी करून मोफत औषधोपचार करण्यात आले. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मेडिसिन विभागाच्या विशेष तज्ज्ञाकडून तपासणी करून मोफत औषधोपचार केल्याने रुग्णांनी समाधान व्यक्त केले.





येळवी येथे ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था व विठ्ठल मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल आणि आय.सी.यू सेंटर यांच्या मार्फत सर्वरोग निदान शिबीर व मोफत औषधोपचार शिबिर संपन्न झाले. या शिबिराचे उद्घाघाटन येळवी चे उपसरपंच मा.सुनिल अंकलगी यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेचे अध्यक्ष दिपक (आण्णा) अंकलगी,ग्रां.पं.सदस्य संतोष पाटील, सचिन माने, येळवी सर्व. सेवा.सह.सोसायटी.चेअरमन संतोष स्वामी, डॉ. विकास पाटील, डॉ. राम्याश्री एच. जी, डॉ. सचिन वाघ आदींच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

यावेळी जवळपास 200 रूग्णांची तपासणी करून त्याच्यावरती मोफत औषधोपचार करण्यात आले. यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना मेडिसिन विभागाच्या विशेष तज्ञाकडून तपासणी करून मोफत औषधोपचार केल्याने रुग्णांनी समाधान व्यक्त केले.

## आण्विक विज्ञान आणि तंत्रज्ञान या विषयावर प्रदर्शन आणि चर्चासत्र ...






Bhabha Atomic Research Centre Mumbai, आयोजित Fabtech Technical Campus Sangola येथे 'आण्विक विज्ञान आणि तंत्रज्ञान' या विषयावर प्रदर्शन आणि चर्चासत्र संपन्न झाले. या सत्रात 'ऑोंकार स्वरुपा इंग्लिश मिडीयम स्कूल ॲन्ड ज्युनिअर कॉलेजी येळवी' च्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन विविध प्रकारच्या उपकरणांची तसेच तंत्रज्ञानाची माहिती जाणून घेतली....

## गुरुपोर्णिमा साजरी...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी. ता. जत येथे गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. यावेळी प्रशालेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले त्याचबरोबर विद्यार्थ्यांनीही आपले मनोगत व्यक्त केले....






## १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिन साजरा...



ओंकार स्वरूपा फाउंडेशन संस्था येळवी संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल ॲण्ड ज्युनिअर कॉलेज येळवी येथे आज दिनांक 15 ऑगस्ट 2022 रोजी संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मा.अनिल अंकलगी (साहेब) यांच्या शुभहस्ते राष्ट्रीयध्वज फडकावुन अमृतमहोत्सवी वर्ष अतिशय उत्साहपूर्ण वातावरणामध्ये संपन्न झाले. यावेळी येळवीचे सरपंच विजयकुमार पोरे, उपसरपंच सुनील अंकलगी, संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव तथा ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, सचिन माने, येळवी सोसायटी चेअरमन संतोष स्वामी, नवनाथ पवार, राजू कदम, वसंत भंडे (मेजर), प्राचार्य भारत निळे (सर) तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी शालेय विद्यार्थी, पालक तसेच नागरिकांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न झाला.

विद्यार्थी गुण गौरव समारंभाचे आयोजन करून सन 2021- 22 मध्ये पहिल्या तीन क्रमांक आलेल्या विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र व सन्मानचिन्ह तसेच रोख रक्कम देऊन विद्यार्थ्यांचा पालकासमवेत सत्कार करण्यात आला. येळवी प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी सोनवणे मॅडम यांचा सेवानिवृत्ती निमित्त ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला...

## राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त क्रीडा स्पर्धांचे आयोजन ...

ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था संचालित ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या वतीने आज राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त कबड्डी स्पर्धेचे आयोजन केले होते. यामध्ये गजानन हायस्कूल जाडरबोबलद हा संघ विजयी झाला..





## नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ संपन्न ...





पुण्य नगरी

**विद्यार्थ्यांनी जगाच्या कल्याणाची दृष्टी, ध्येय ठेवावे**

**गणेश माने महाराज : ओंकारस्वरूपा कॉलेजमध्ये नवागत विद्यार्थ्यांचे जंगी स्वागत**

जत / प्रतिनिधी

भारतीय संस्कृती, परंपरेला, लढ्याला फार मोठा इतिहास आहे. मोबाइलच्या या युगात जगात एक नंबर संस्कृती असलेल्या भारतीय संस्कृतीचे खरी ओळख आपणास आहे का याचे आत्मचिंतन आजच्या मोबाइलवेड्या विद्यार्थ्यांनी करावे, असे आवाहन आटपाडी तालुक्यातील दिघंची येथील मुक्ता इंग्लिश मीडियम स्कुल अँन्ड ज्युनिअर कॉलेज व निवासी शाळेचे संस्थापक गणेश माने महाराज यांनी केले.

जत तालुक्यातील ओंकारस्वरूपा फौंडेशन संचलित ओंकारस्वरूपा न्यु इंग्लिश स्कुल व ज्युनिअर कॉलेज येथे नववी व अकरावीत नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्यावतीने जंगी स्वागत करण्यात आले. वेलकम फंक्शनचे आयोजन करण्यात आले होते.

येळवी : ओंकारस्वरूपा न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजमध्ये मान्यवरांच्या उपस्थितीत नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी हभप गणेश माने, पंचाक्षरी अंकलगी, रामचंद्र नरळे, सुनील अंकलगी, दीपक अंकलगी, संतोष पाटील, आंनदा क्षीरसागर आदी.

**■ ओंकारस्वरूपा कॉलेज एक नंबर करण्याचा संकल्प**

ओंकारस्वरूपा फौंडेशन संस्थेचे मार्गदर्शक पंचाक्षरी, अनिल अंकलगी, सुनील अंकलगी यांच्या मार्गदर्शनाखाली अवघ्या दोन वर्षात ओंकारस्वरूपा न्यू इंग्लिश स्कूल व ज्युनिअर कॉलेजने येळवीसह पंचक्रोशीत एक आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सोलापूर जिल्ह्यातील विद्यार्थीही येथे प्रवेश घेत आहेत. शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकास हेच ध्येय संस्थेने ठेवले आहे. येणाऱ्या काळात संस्था जिल्ह्यात एक नंबरला पोहचेल, असा विश्वास संस्थेचे अध्यक्ष दीपक अंकलगी, सचिव संतोष पाटील यांनी व्यक्त केला.

नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी व विद्यार्थिनीचा गुलाबपुष्प देवून गणेश माने महाराज, व्याख्याते रामचंद्र नरळे आदी मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षस्थानी येळवीचे उपसरपंच सुनील अंकलगी होते. यावेळी पंचाक्षरी अंकलगी, संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक अंकलगी, ग्रामपंचायत सदस्य संतोष पाटील, हागिरगे येथील मुख्याध्यापक आनंदा क्षीरसागर, येळवी सोसायटीचे चेअरमन संतोष स्वामी, संतोष पोरे उपस्थित होते.

गणेश माने महाराज यांनी आपल्या खास शैलीत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. जीवनात यशस्वी व्हायचे असेल तर आपण स्वतः आपला मार्ग, आपली दिशा, आपले ध्येय निश्चित केले पाहिजे. मला हे मिळाले नाही, ते मिळाले नाही म्हणत नकारघंटा वाजवू नका, असे ते म्हणाले. व्याख्याते रामचंद्र नरळे म्हणाले, जिद्द, प्रामाणिकपणा व कष्ट करण्याची तयारी ठेवली की यशाचा मार्ग अवघड नाही. विद्यार्थ्यांनी आपले स्वप्न पूर्ण करण्यासाठी अहोरात्र मेहनत घ्यावी असे आवाहन केले.

Smart Sangli
Page No 4 August 29, 2022

ओंकार स्वरूपा फौडेशन संस्था संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज इयत्ता अकरावी व नववी मधील नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत (WEL-COME) समारंभ संपन्न झाला.

यावेळी प्रमुख पाहुणे ह.भ.प.श्री.गणेश अशोकराव माने (व्याख्याते, प्रवचनकार, कीर्तनकार) संस्थापक ह.भ.प.श्री.संदीपान माने बहुउद्देशीय व सामाजिक सेवाभावी संस्था दिघंची (आटपाडी) तसेच प्रमुख उपस्थिती कुणिकोणुर येथील आदर्श शिक्षक रामचंद्र नरळे (सर), संस्थेचे मार्गदर्शक पंचाक्षरी (काका) अंकलगी, उपसरपंच सुनील अंकलगी, संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी, सचिव तथा ग्रा.पं. सदस्य संतोष पाटील, येळवी सर्व सेवा सोसा. चेअरमन संतोष स्वामी, दै.पुण्यनगरी तालुका प्रतिनिधी मारुती , TBM न्यूज़चे संतोष पोरे, प्राचार्य भारत निळे, प्रशालेचे शिक्षक शिक्षकेतर स्टाफ तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते...

## आधार कार्ड नोंदणी शिबीर ...









मा. जिल्हाधिकारी सांगली यांच्याकडे निवेदन देऊन वेळोवेळी पाठपुरावा करून येळवी गावामध्ये आधार कार्ड कॅम्प भरवुन जवळपास 150 लोकांचे आधार कार्डचे काम यशस्वी पार पाडले. आधार कार्डचे काम झाल्यानंतर बऱ्याच नागरिकांनी आभार मानले.

आधार कार्ड नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद. ओंकार स्वरूपा फौडेशन संस्था येळवीच्या वतीने गणेशोत्सवानिमित्त आधार कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

## नवरात्रोत्सव प्रारंभ ...



श्री अंबाबाई मंदिर जत येथून जत-येळवी ज्योत आणून अंबाबाई मंदिरामध्ये नवरात्रोत्सवास प्रारंभ करण्यात आला.....

## जागर 'स्त्री' शक्तीचा अंतर्गत विविध कार्यक्रम...






ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था संचलित ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेज येळवीच्या वतीने "जागर स्त्री शक्तीचा" या कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी हळदीकुंकू कार्यक्रम,रास दांडिया स्पर्धा, उखाणे स्पर्धा, स्पॉट गेम,लहान मुलांसाठी स्पीच कॉम्पिटिशन या स्पर्धांचे उद्घाटन लोकप्रिय आमदार विक्रमसिंह(दादा) सावंत यांच्या सुविध पत्नी मा.सौ. वर्षाताई सावंत, जत नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष मा.सौ.शुभांगी (ताई) बन्नेनवर व ललिता सावंत यांच्या हस्ते पार पडली....

प्रशालेतील सर्व विद्यार्थी, विद्यार्थ्यांचे पालक, महिला बचत गटातील अनेक महिला यांनी कार्यक्रमात सहभाग नोंदवत कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला. विद्यार्थ्यांसाठी स्पीच कॉम्पिटिशन स्पर्धेमध्ये प्रथम व द्वितीय क्रमांक येणाऱ्या विद्यार्थ्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले, उखाणे स्पर्धेत अनेक महिलांनी उखाणे घेत कार्यक्रमात रंगत आणली, यातील विजेत्या महिलांना पारितोषिक वितरण करण्यात आले. एस युनिट डान्स अकॅडमी या ग्रुपच्या सदस्याने गरबा नृत्य करत येळविकारांची मने जिंकले. स्पॉट गेम अंतर्गत अनेक महिलांना तसेच युवकांना विद्यार्थ्यांना अनेक बक्षिसे मिळाली.

## डॉ.ए.पी.जे. अब्दलु कलाम जन्मदिनी वाद-विवाद स्पर्धा संपन्न...







ओंकार स्वरूपा तर्फे डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचा जन्मदिनी वाद-विवाद स्पर्धा संपन्न झाल्या. येळवीचे वृत्तपत्र विक्रेते मा. चंद्रकांत सोंगटे यांचा वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त संस्थेतर्फे सत्कार...

येळवी सारख्या ग्रामीण भागात सन 1990 पासून आज पर्यंत वृत्तपत्र विक्रेता म्हणून चंद्रकांत सोंगटे काम करत आहेत. वृत्तपत्र विक्रेता दिनाचे औचित्य साधुन ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल जूनियर कॉलेजच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला....

त्याचबरोबर कॉलेजच्या वतीने वादविवाद स्पर्धेचे आयोजन केले होते यामध्ये उत्स्फूर्तपणे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत वाद-विवाद स्पर्धा यशस्वी रित्या पार पडल्या.

## सहल मामाचं गाव ...





ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी या प्रशालेची प्राथमिक विभागाची सहल मामाच गाव (खारवटवाडी) या ठिकाणी गेली होती यावेळी विद्यार्थ्यांनी खेळाबरोबर मनोरंजन त्याचबरोबर रेन डान्सचा आनंद घेतला.....

## सावित्रीबाई फुले जयंती साजरी...





आज ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी, जत येथे सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली......

## तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन ...








ओंकार स्वरूपा व नेहरू युवा केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा संपन्न.....

क्रीडा स्पर्धेचे उद्घाटन येळवीचे नुतन उपसरपंच मा. विश्वास खिलारे यांच्या हस्ते संपन्न झाले यावेळी माझी उपसरपंच सुनील अंकलगी, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं. सदस्य संतोष पाटील, येळवी सोसायटीचे चेअरमन संतोष स्वामी,राजु कदम, प्राचार्य भारत निळे, तसेच शिक्षक व शिक्षक इतर स्टाफ उपस्थीत होता.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या खेळ प्रकाराला वाव देण्यासाठी धावणे, कबड्डी, खो-खो ,व्हॉलीबॉल, थाळी फेक ,गोळा फेक, रस्सीखेच अशा विविध क्रीडा प्रकारात अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत स्पर्धा यशस्वीरित्या पार पाडल्या.

## प्रजासत्ताक दिन साजरा ...



# ओंकार स्वरुपा फेस्टिवल 2023 ...












ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्था संचलित, ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी. या प्रशालेचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात पार पडला.....

ओंकार स्वरूपा फेस्टिवल- 2022-23 ओंकार स्वरूपा फेस्टिवल चे उद्घाटन सांगली जिल्हा मध्यवर्ती बँकेची संचालक मा. प्रकाशराव जमदाडे साहेब व जतचे युवा नेते मा. धैर्यशील दादा सावंत यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ज्येष्ठ नागरिक पंचाक्षरी काका अंकलगी , माजी सरपंच दादासाहेब माने काका, संस्थेचे प्रमुख मार्गदर्शक मा. अनिल अंकलगी साहेब,जत सोसायटीची चेअरमन मा. मोहन भैय्या कुलकर्णी, येळवीच्या सरपंच सौ.आरतीताई अंकलगी, येळवी सर्व सेवा सोसायटीचे चेअरमन संतोष स्वामी, उपसरपंच विश्वास खिलारे, येळवी ग्रामपंचायत सदस्य श्रीकांत सातपुते, निलाबाई कदम, शिनाबाई जमदाडे, शारदा चव्हाण, शोभा भंडे, ओंकार स्वरूपा फौंडेशन संस्थेचे अध्यक्ष दीपक आण्णा अंकलगी, संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील उपस्थित होते.

## इयत्ता १२ वी च्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ ...

ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येथे इयत्ता 12 वीच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ संपन्न....

कार्यक्रमाचे उद्घाटन येळवीच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच मा.सौ.आरती अंकलगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी उपसरपंच विश्वास खिलारे, राजे रामराव महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक पांडुरंग वाघमोडे (सर), ह.भ.प. बंडगर महाराज (घेरडी), ज्येष्ठ नागरिक पंचाक्षरी (काका) अंकलगी, ह.भ.प. शशिकांत (महाराज) गानमोटे, संस्थेचे सचिव तथा ग्रा. पं. सदस्य संतोष पाटील, प्रशालेचे प्राचार्य भारत निळेसर शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ उपस्थित होता.



येळवी : येथील ओंकारस्वरुपा इंग्लिश मीडियम स्कूल व ज्युनिअरमधील १२ वीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला.

### ओंकारस्वरुपा स्कूलमध्ये बारावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**जत / प्रतिनिधी :** जत तालुक्यातील येळवी येथील ओंकारस्वरुपा इंग्लिश मिडियम स्कूल व ज्युनिअर कॉलेज मधील बारावीच्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या उपस्थितीत निरोप देण्यात आला. कार्यक्रमाचे उद्‌घाटन येळवीच्या प्रथम लोकनियुक्त महिला सरपंच आरती अंकलगी यांच्या हस्ते झाले. यावेळी उपसरपंच विश्वास खिलारे, राजे रामराव महाविद्यालयाचे माजी प्राध्यापक पांडुरंग वाघमोडे, हभप बंडगर महाराज, ज्येष्ठ नागरिक पंचाक्षरी अंकलगी, शशिकांत महाराज गानमोटे, संस्थेचे सचिव तथा ग्रा. पं. सदस्य संतोष पाटील, प्रशालेचे प्राचार्य भारत निळे आदी उपस्थित होते. यावेळी प्रा. पांडुरंग वाघमोडे म्हणाले, ज्यावेळी आपण महाविद्यालयात प्रवेश घेतो तेव्हा आपल्या मनात गोंधळाची परिस्थिती असते. ११ वी आणि १२ वी मध्ये विद्यार्थ्यांना योग्य मार्गावर घेवून जाण्याचे काम शिक्षक करत असतात. विद्यार्थ्यांनी पुढील काळात याच शिदोरीचा उपयोग करावा, असे आवाहन केले. प्रास्ताविक प्राचार्य भारत निळे यांनी केले. संतोष पाटील यांनी आभार मानले.

यावेळी प्राध्यापक पांडुरंग वाघमोडे म्हणाले, विद्यार्थ्यांच्या जीवना मध्ये आनंदाचे क्षण देणारे शिक्षक आणि शिक्षकांमुळे घडणारा विद्यार्थी होय . ज्यु. कॉलेजला शिक्षक शिकवत असताना 2 वर्षा मध्ये विद्यार्थी आणि शिक्षकाचा जास्त संपर्क येतो.या दोन वर्षामध्ये शिक्षक शिकवत असताना अभ्यासक्रमा बरोबरच विद्यार्थी सर्व गुणसंपन्न कसा बनेल व आपल्या असणाऱ्या प्रतिकुल परिस्थितीवर मात करत विद्यार्थ्यांनी यश कशा प्रकारे संपादन केले पाहिजे. जीवनामध्ये एक चांगला माणूस कशा पद्धतीने घडला गेला पाहिजे यासाठी शिक्षक प्रामाणिकपणे प्रयत्न करत असतात. आणि त्या प्रयत्नाला अनेक विद्यार्थी उत्तम प्रतिसाद देत असतात.

विद्यार्थी आणि शिक्षकाचा असणारा ऋणानुबंध हा आयुष्यभर कायम टिकून राहतो हा माझा आजवरचा अनुभव आहे आसे सांगितले. आजच्या निरोप समारंभ कार्यक्रमाची आठवण सदैव स्मरणात राहिल असे सांगून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या....

## हळदी-कुंकू समारंभ ...






महिला दिनानिमित्त हळदी कुंकू समारंभ सोबत खास महिलांसाठी कॉमेडी शो, कथाकथन व काव्य गायनाचे असे मनोरंजन व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## विज्ञान दिवस साजरा ...






ओंकार स्वरुपा तर्फे विज्ञान दिवस साजरा ......

ओंकार स्वरूपा इंग्लिश मिडियम स्कूल अँड ज्युनि.कॉलेज येळवी येथे डॉ. सी.व्ही. रमन यांच्या फोटोचे पुजन शासकीय सेवानिवृत्त डॉ. दुंडाप्पा स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विध्यार्थ्यांनी अनेक प्रयोगासह प्रात्यक्षिके सादर केली. यावेळी संस्थेचे अध्यक्ष दीपक (आण्णा) अंकलगी तसेच संस्थेचे सचिव तथा ग्रा.पं.सदस्य संतोष पाटील,नितीन माने, प्राचार्य भारत निळे (सर) तसेच शिक्षक व शिक्षकेतर स्टाफ, पालक आदी उपस्थितीत होते.

## महिलांसाठी ‘खव्य्यांची जत्रा’ कार्यक्रम...





ओंकार स्वरुपा फौंडेशन संस्था व अंबिका महिला ग्राम संस्था महिला बचत गट येळवी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला दिनाच्या औचित्य साधून येळवी या.जत येथे "खवय्यांची जत्रा"हा इव्हेंन्ट आयोजित केला आहे. यामध्ये महिला विविध प्रकारच्या खाण्याचे स्टॉल लावणार असून, अत्यल्प कमी दरात ना- नफा- ना- तोटा या तत्त्वावर वेगवेगळ्या खाद्यपदार्थांची विक्री केली जाणारा असून. या ठिकाणी बसून खाण्याची सोय त्याचबरोबर खाद्यपदार्थांच्या पार्सलची सोय केलेली आहे. तरी येळवी परिसरातील नागरिकांनी याचा लाभ घ्यावा....

प्रथमच येळवी मध्ये अशा प्रकारचे नियोजन केले असून महिलांच्या मध्ये व्यवसायाबद्दल आत्मविश्वास निर्माण व्हावा.. महिलांचे आर्थिक बळकटीकरण व्हावे.. महिलांच्यातील पाककलेला वाव मिळावा या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित केला आहे. तरी आपण सर्व नागरिकांनी कुटुंबासोबत उपस्थितीत राहून या कार्यक्रमात उपस्थितीत राहावे ही विनंती.....

# अंगणवाडी विद्यार्थ्यांचा 'Kindergarten' कार्यक्रम साजरा...



ओंकार स्वरूपा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज येळवी ता.जत येथे यु.के.जी मध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांचा अंगणवाडी कोर्स पूर्ण केल्याबद्दल "Kindergarten" हा



कार्यक्रम संपन्न झाला.....

या कार्यक्रमाचे उद्‌घाटन जत पंचायत समितीचे शिक्षण विस्तार अधिकारी मा. तुकाराम गायकवाड साहेब यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून येळवीच्या लोकनियुक्त महिला सरपंच सौ. आरती अंकलगी, ग्रा.पं. सदस्य तथा संस्थेचे सचिव संतोष पाटील, जि.प.शाळा येळवीचे मुख्याध्यापक भारत क्षिरसागर सर,प्राचार्य भारत निळे (सर), माजी ग्रा.पं. सदस्य नितीन माने, डॉक्टर सचिन काळे, शिक्षक शिक्षकेत्तर स्टाफ उपस्थितीत होता.

यावेळी शिक्षण विस्तार अधिकारी गायकवाड साहेब म्हणाले, जत तालुक्यात पहिल्यांदाच हा उपक्रम संस्थेने राबवला आहे त्याबद्दल संस्थेचे अभिनंदन केले. पालक व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले आयुष्यात संगतीला खूप महत्त्व आहे. आपण कोणाच्या संगतीत राहावे हे ज्याचे त्याने ठरवावे. आपण ज्या संगतीत राहतो वाढतो आपण तसेच घडतो. ग्रामीण भागात ओंकार स्वरूपा ही संस्था शैक्षणिक व सामाजिक कार्यात खूप मोठं काम उभा करेल असे गायकवाड साहेब यांनी सांगितले.